# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक: 27.03.2024** **वार: बुधवार**

---

**स्थलांतरीत**

बारामती लोकसभा मतदारसंघात मतदानाचं प्रमाण वाढावं यादृष्टीनं कमी मतदान असलेल्या मतदान केंद्राबाबत सूक्ष्म नियोजन करावं आणि स्थलांतरीत कामगारांचं मतदान सुलभ होईल यासाठी कृतीयोजना तयार करावी, अशा सूचना बारामती लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी कविता द्विवेदी यांनी दिल्या. विभागीय आयुक्त कार्यालयात आज आयोजित आढावा बैठकीत त्या बोलत होत्या.

**सूक्ष्म-नियोजन**

मतदानासाठी निवडणूक आयोगाच्या सूचनेप्रमाणं सूक्ष्म नियोजनावर भर देण्यात येत आहे. याकरिता ४७ हजारापेक्षा अधिक अधिकारी-कर्मचाऱ्यांना १ एप्रिलपासून प्रशिक्षण सत्रं आयोजित करण्याचे निर्देश पुण्याचे जिल्हाधिकारी डॉक्टर सुहास दिवसे यांनी दिले आहेत. कर्मचाऱ्यांना ईव्हीएमच्या प्रात्यक्षिकासह नियमांची माहिती देण्यासाठी तज्ज्ञ प्रशिक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

**उन्हिवडणूक**

उन्हाच्या तीव्र लाटेच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगानं सर्व राज्यांच्या निवडणूक अधिकाऱ्यांना आरोग्यविषयक अतिदक्षतेचा सल्ला जारी केला आहे. यावर्षी मार्च ते जून दरम्यान अधिक तीव्र उष्णतेच्या दीर्घ लाटा येण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. या पार्श्वभूमीवर काय करावं आणि काय करु नये याविषयी राष्ट्रीत आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणानं दिलेल्या सूचना निवडणूक आयोगानं वितरित

केल्या आहेत. यात प्रामुख्यानं दुपारी बारा ते तीन वाजेपर्यंत बाहेर न पडण्याचा सल्ला लोकांना दिला आहे.

**<u>फळबाग</u>**

पुणे जिल्ह्यात २०२३- २४  मध्ये दोन हजार २७६ हेक्टरवर नव्यानं फळबागांची लागवड करण्यात आली आहे. पावसाचं प्रमाण कमी असूनही दुष्काळी स्थितीत योजनेत शेतकऱ्यांनी चांगला सहभाग घेतल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे यांनी दिली.

**<u>कृषी-बाजार</u>**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये बाहेरील किंवा व्यापाऱ्यांच्या वजनकाट्यावर वजन केल्यामुळे शेतमालाच्या वजनात तफावत आढळल्यानं शेतकऱ्यांचं आर्थिक नुकसान होत असल्याच्या तक्रारी पणन संचालनालयास प्राप्त होत आहेत. त्यामुळे अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक वजनकाटे बसवावेत, अशा सूचना यापूर्वीच दिल्या आहेत. तसंच, अशा वजनकाट्यांबाबत शेतकऱ्यांच्या तक्रारी आल्यास संबंधित बाजार समित्यांवर  योग्य कारवाई करण्याच्या सूचना पणन संचालक विकास रसाळ यांनी सर्व जिल्हा उपनिबंधकांना दिल्या आहेत.

**<u>प्रीपेड-मीटर</u>**

पुण्यातील बंडगार्डन त्याचबरोबर नगर रस्त्यावरील काही शहरी आणि ग्रामीण भागात सर्वप्रथम महावितरणकडून विजेचे प्रीपेड मीटर बसवण्यात येणार आहेत. एप्रिल महिन्यात पथदर्शी प्रकल्प म्हणून ही मोहीम राबवली जाणार असून त्याच्या यशानुसार शहरातील अन्य भागात ही मोहीम राबवली जाणार आहे.

**<u>ताडी</u>**

पुण्यात रासायनिक ताडी तयार करण्यासाठी लागणाऱ्या क्लोरल हायड्रेटचा कारखाना पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेनं संगमनेरमध्ये जाऊन उद्धस्त केला. पोलिसांनी या कारवाईत तेविसशे किलो क्लोरल हायड्रेट भुकटी तसंच रसायन तयार करण्यासाठी वापरण्यात येणारी उपकरणं जप्त केली आहेत.

**<u>कक्ष</u>**

पुणे मनपाच्या आत्पकालीन व्यवस्थापन कक्षात कायमस्वरूपी कर्मचारी नियुक्त केले जाणार आहेत. पावसाळापूर्व सर्व कामे १५ मेपर्यंत पूर्ण करण्यात येतील. शहरात पावसाचं पाणी साठणाऱ्या १७१ ठिकाणांची पाहणी केली जाईल असं पुणे महापालिकेचे आयुक्त डॉक्टर राजेंद्र भोसले यांनी सर्व विभाग प्रमुखांच्या बैठकीत सांगितलं. या कर्मचाऱ्यांना पावसाळा सुरू होण्यापूर्वी आवश्यक प्रशिक्षण दिलं जाणार आहे.

**<u>निवड</u>**

डेव्हलपिंग लायब्ररी नेटवर्कच्या संचालक मंडळावर पुण्यातील 'यशस्वी' संस्थेचे ग्रंथपाल पवन शर्मा यांची दुसऱ्यांदा निवड करण्यात आली आहे. ग्रंथालयांचं कामकाज अद्ययावत करण्यासाठी परस्पर समन्वय, माहितीची देवाणघेवाण आणि सहकार्य वाढविण्याचा डेलनेटद्वारे प्रयत्न केला जाणार असल्याचं पवन शर्मा यांनी सांगितलं.

**<u>वीज-कारवाई</u>**

पुणे महावितरणकडून थकबाकी नियमानुसार वीजपुरवठा खंडित करण्याची धडक कारवाई सुरू आहे. त्यानुसार पश्चिम महाराष्ट्रातील १७ हजार ३३९ ग्राहकांना थकबाकीची रक्कम भरल्यानंतर वीजपुरवठा पुन्हा जोडून घेण्यासाठी नियमानुसार ५७ लाख ६७ हजार रुपये शुल्क भरावे लागलं, अशी माहिती प्रादेशिक संचालक अंकुश नाळे यांनी दिली. त्यामुळं थकीत वीजबिलाची रक्कम ग्राहकांनी ताबडतोब भरावी, असं आवाहन नाळे यांनी केलं आहे.

**<u>बीज</u>**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीनं संत तुकाराम महाराज बीज निमित्त संत तुकारामनगर तसंच भक्ती-शक्ती चौक निगडी इथल्या संत तुकाराम यांच्या पुतळ्यास महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

**<u>क्रिकेट</u>**

पुणे जिल्हा क्रिकेट संघटनेच्या मान्यतेने जिल्हास्तरीय एसए अजिंक्यपद करंडक' १२ वर्षाखालील मुलांच्या आंतरक्लब टी-२० क्रिकेट स्पर्धा सुरू झाल्या आहेत. या स्पर्धेत सईश बारटक्के याच्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर व्हेरॉक संघाने ब्रिलीयंट्स स्पोटर्स ॲकॅडमीचा २८ धावांनी पराभव केला. अन्य दुसऱ्या सामन्यात सुधाकर राठोड याच्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर व्हेरॉक वेंगसरकर ॲकॅडमीने एएसजी क्रिकेट ॲकॅडमीचा ९ गडी राखून सहज पराभव केला.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**